# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे

दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक – ३७३/२०२४ दिनांक ०७/१०/२०२४

## प्रेस नोट

### "तडीपार करण्यात आलेल्या आरोपीस अटक करण्यास मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश"

इसम नामे सलीम मोहम्मद हारुण रा. मिरारोड पुर्व, ता. जि. ठाणे याचे विरुध्द सन २०२२ ते २०२४ या कालावधीत उत्तन पोलीस ठाणे व काशिमीरा पोलीस ठाणे येथे चोरी, घर फोडी, दुखापत करुन जबरी चोरी यासारखे गुन्हे दाखल असुन ते न्यायप्रविष्ठ आहेत. सदर गुन्हयात अटक होवुनही त्याचे गुन्हेगारी वृत्तीत बदल झालेला नाही. नमुद इसमाचे वर्तन सुधारावे म्हणुन सी.आर.पी.सी. १०९ प्रमाणे चॅप्टर करुनही त्याचे वर्तनात बदल न होता. पुन्हा त्याचेवर काशिमीरा पो.ठाणे येथे चोरीचा गुन्हा दाखल झाला. त्याचे समाजविघटीत कृत्यामुळे समाजाचे व आजुबाजुच्या परीसरात राहणाऱ्या नागरीकांच्या जिवीतास तसेच मालमत्तेस धोका नाकारता येणार नाही याकरीता मा.पोलीस उप आयुक्त, परीमंडळ क्र.०१ यांचे कार्यालयीन जा.क्र.पो.उपआ.परी.-१/मिरारोड/ वाचक/ हद्दपार आदेश/५०८३/ २०२४ तसेच हददपार आदेश क्र.१४/२०२४ अन्वये दि.३१.०८.२०२४ अन्वये चे आदेशा प्रमाणे महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ५६,(१),(अ),(ब) प्रमाणे हद्दपार इसम नामे सलीम मोहम्मद हारुण शहा वय-२५ वर्षे यास ठाणे जिल्हा, पालघर जिल्हा, मुंबई शहर, मुंबई उपनगरे या कार्यक्षेत्रातुन दोन वर्षाकरीता तडीपार करण्यात आलेले होते.

मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. अविनाश अंबुरे यांनी कार्यक्षेत्रातील गंभीर गुन्हयातील पाहीजेत/ फरारी आरोपीचे शोधा करीता आदेश दिलेले होते. दिनांक ०२.१०.२०२४ रोजी सहा.पो.निरी नितीन बेंन्द्रे, सफौ.९६०५० मनोहर बाळासाहेब तावरे, पोहवा.०७१५४ प्रविणराज ज्ञानदेव पवार, पोहवा.०६०३० राजविर बोधासिंग संधु, पोहवा.१२०१० अनिल रामदास नागरे असे गुन्हेगार वॉच पेट्रोलिंग फिरत असतांना काशिमीरा, मिरारोड पुर्व येथील सुन्नी मस्जिदचे बाहेर हद्दपार इसम सलीम मोहम्मद हारुण शहा हा उभा असलेला पथकास दिसुन आल्याने त्यास शिताफीने ताब्यात घेवुन हद्दपार इसम हा ठाणे जिल्हातुन हद्दपार असतानाही तो वरील ठिकाणी कोणतीही परवानगी न घेता आल्याने मिळुन आला त्याचे विरुध्द काशिमीरा पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ प्रमाणे गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात आलेली आहे.

सदरची कारवाई ही मा.पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री.अविनाश अंबुरे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.मदन बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पोनि. राहुल राख, पोनिरी.धनांजय पोरे, सपोनि. नितीन बेन्द्रे, दत्तात्रय सरक, पोउपनि. हितेंन्द्र विचारे, सफौ. श्रीमंत जेधे, मनोहर तावरे, आसीफ मुल्ला, पोहवा. अनिल नांगरे, प्रविण पवार, राजविंर संधु, हनुमंत सुर्यवंशी,

संग्राम गायकवाड, सतिष जगताप, राजाराम काळे, महेश वेल्हे, शिवाजी पाटील, गोविंद केंद्रे, संतोष मदने, पोशि. अंकीत सुतार, नितीन राठोड, साकेत माघाडे, अंगद मुळे, मसुब सचीन चौधरी सर्व नेमणुक मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा यांनी यशस्वी कामगिरी केली आहे.

----000----